महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ जा.क्र.०४/२०२४/ № 03723 दिनांक: 30 APR 2026

# सूचना

## जाहिरात क्र.०४/२०२४ अंतर्गत "तंत्रज्ञ-३" पदाकरीता उपस्थित सर्व उमेदवारांचे गुण, कागदपत्रे पडताळणीच्याअंती पात्र / अपात्र/ अतिरिक्त पडताळणी आवश्यक उमेदवारांची यादी आणि अंतिम निवड / प्रतिक्षा यादी.

**संदर्भ**:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४
२) महानिर्मिती सुचना क्र.९५०१ दि.२४.१०.२०२५

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०४/२०२४ अंतर्गत तंत्रज्ञ-३ पदांकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि.०८, ०९, १० व १५.०५.२०२५ रोजी ऑनालाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती.

त्यानुषंगाने तंत्रज्ञ-३ पदाकरीता ऑनलाईन परिक्षेस उपस्थित सर्व उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेमधील गुण तसेच उमेदवारांना लागू असणाऱ्या जाहिरातीतील विविध अटी व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे पडताळणीअंती पात्र/ अपात्र/ अतिरिक्त पडताळणी आवश्यक उमेदवारांची यादी आणि अंतिम निवड / प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कागदपत्रे पडताळणीअंती जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हतेसह इतर सर्व पुर्वावश्यकता आणि अटी व शर्ती पूर्ण करत असलेल्या उमेदवारांचा समावेश "पात्र" म्हणून तर पुर्वावश्यकता पूर्ण करित नसलेल्या उमेदवारांचा समावेश "अपात्र" उमेदवारांच्या यादीत अपात्रतेच्या कारणासह करण्यात आला आहे. याशिवाय कागदपत्रांच्या प्राथमिक पडताळणीअंती काही उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी शासन नियमानुसार संबंधित शासकिय प्राधिकारणांकडून आवश्यक असल्याने, आयटीआय व्यवसाय पूर्ण केलेल्या संस्थेची शासनमान्यता पडताळणी, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांबाबतची वैधता पडताळणी इत्यादी बाबींसाठी पात्र/ अपात्र बाबत निर्णय प्रलंबित असलेल्या उमेदवारांचा समावेश "अतिरिक्त पडताळणी आवश्यक" उमेदवारांच्या यादीत करण्यात आला आहे. सदरील उमेदवारांच्या नावाचा समावेश अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत असल्यास, वरील प्रमाणे संबंधित पडताळणी प्राधिकरणाच्या अहवालाच्या अधिन राहून नियुक्ती बाबत निर्णय घेण्यात येईल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच केवळ निवड /प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश असल्याने तात्काळ नियुक्ती देण्याबाबत कोणताही अधिकार संबंधित उमेदवारांना नसेल, याची देखील नोंद घ्यावी. ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांचे गुण प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी ↵ क्लिक करावे.

**तंत्रज्ञ- ३ पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांची गुणांची यादी** ↵

तंत्रज्ञ-३ पदांकरीता कागदपत्रे पडताळणीअंती पात्र/ अपात्र आणि अतिरिक्त पडताळणी आवश्यक असलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**तंत्रज्ञ- ३ पदासाठी कागदपत्रे पडताळणीअंती उमेदवारांची पात्र/ अपात्र/ अतिरिक्त पडताळणी आवश्यक असलेल्या उमेदवारांची यादी** ↵

तंत्रज्ञ-३ पदाकरीता प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत नमुद सामाजिक व समांतर आरक्षणानुसार कागदपत्रे पडताळणीअंती उमेदवारांची अंतिम निवड यादी/ प्रतिक्षा यादी प्राप्त करण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**तंत्रज्ञ- ३ पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता सामान्य श्रेणी उमेदवारांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी** ↵

**महानिर्मिती कंपनीचे किमान ०५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी** ↵

**महानिर्मिती कंपनीचे ०१ ते ०४ वर्षे किंवा कालावधीचे प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी** ↵

**बी.टी.आर.आय आरक्षणातंर्गत उमेदवारांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी** ↵

**अटी व शर्ती** :-

१) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादी ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, महिला आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून भविष्यात काही तफावत आढळल्यास संबंधित उमेदवारांची नियुक्ती किंवा उमेदवार रुजू झाल्यास नोकरीचा लाभ कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

२) परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी, एका उमेदवाराकडून एका पदाकरीता एकच अर्ज करणे अपेक्षीत होते. तथापि, काही उमेदवारांनी एकाच पदाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज केले असून, अशा प्रकरणी त्यांचा नवीनत्तम (Latest) अर्ज विचारात घेण्यात आला आहे. याशिवाय, ऑनलाईन अर्जातील माहितीत थोडा बदल करुन एकापेक्षा जास्त अर्ज केलेल्या आणि त्यानुसार एकापेक्षा अधिक प्रवेशपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांनी, ज्या प्रवेशपत्रावर ऑनलाईन परीक्षा दिली आहे, सदरील परीक्षार्थी क्रमांकानुसार त्यांचा विचार करण्यात आला आहे.

३) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. सदरील यादी ही पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधिन राहून प्राप्त गुणानुसार तयार करण्यात आली आहे.

४) उपरोक्त अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी विविध समांतर व सामाजिक आरक्षणातंर्गत अर्ज सादर केले असल्यास त्याबाबतचे जाहिरातीतील अटी व शर्ती तसेच शासनाने पारीत केलेले संबंधित आरक्षणातंर्गत नियम व शर्तींच्या अनुषंगाने कागदपत्रे उमेदवारांजवळ असणे ही संपूर्णत: उमेदवारांची जबाबदारी आहे. तसेच सदरील कागदपत्रे उमदेवारांनी सादर न केल्यास उमेदवारांची निवड ताबडतोब रद्द करण्यात येईल.

५) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णयानुसार गुणवत्ताधारक खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांच्या खेळाडू प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित विभागामार्फत करण्यात येईल व त्यानंतरच सदरील उमेदवारांना नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येईल.

६) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२.०२.२०१९ व त्यानंतर पारीत केलेले त्यासंबंधीतचे इतर शासन निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गातून निवड/ प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) या प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रात, उमेदवाराचे स्वत:चे उत्पन्न असल्यास, स्वत:चे व कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न हे "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी" (EWS) कमाल उत्पन्न मर्यादेच्या आत असल्याबाबत नमूद असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पडताळणीअंती "आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त करुन घेताना, उमेदवाराने खोटी माहिती अथवा पात्र नसताना देखील "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (EWS) प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे निष्पन्न झाल्यास, उमेदवारास तात्काळ "अपात्र" ठरविण्यात येईल आणि सदरील उमेदवाराविरोधात भरतीच्या कोणत्याही टप्प्यात अथवा रुजू झाल्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने दिव्यांग आणि अनाथ आरक्षणातून उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधीत दिव्यांग प्रर्वगातील पर्याप्त उमेदवार प्राप्त न झाल्यास, सदरील पदे सामान्य उमेदवारांमधून गुणानुक्रमे भरण्यात आली आहेत.

८) कागदपत्रे पडताळणी दरम्यान आढळून आले की, एका प्रकल्पग्रस्ताचे एकापेक्षा अधिकवेळा जमिनीचे संपादन महानिर्मिती कंपनीमार्फत झाले असल्यास अशा प्रकरणी एकापेक्षा अधिक व्यक्तींना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहेत. वास्तविक:अशा प्रकरणी प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एकच व्यक्ती नोकरीच्या लाभसाठी "पात्र" असल्याची महानिर्मिती कंपनीची धारणा असल्याने, याबाबत महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. सदरील मार्गदर्शन प्रलंबित असल्याने अशा प्रकरणी संबंधित उमेदवारांचा समावेश "अतिरिक्त पडताळणी आवश्यक" असलेल्या उमेदवारांच्या यादीत करण्यात आला आहे. तथापि, अशा उमेदवारांची नावे निवड / प्रतिक्षा यादीत समाविष्ट असल्यास, महाराष्ट्र शासनाकडुन आवश्यक अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारास नियुक्तीपत्र निर्गमित करण्यात येईल. तसेच काही विद्युत केंद्रात असे आढळुन आले आहे की, एकाच सर्व्हे क्रमांक / गटावर एकापेक्षा अधिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीचा लाभ दिला आहे. सबब,अशा उमेदवारांची नावे निवड / प्रतिक्षा यादीत असल्यास सदर प्रकरणी संबंधित जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांच्याकडुन फक्त एकच प्रकल्पग्रस्तास नोकरीचा लाभ देणे बंधनकारक असल्याने त्यानुसार अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारास नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येईल.

९) काही उमेदवारांची निवड विद्युत सहाय्यक म्हणुन महावितरण / महापारेषण या कंपनीत प्रकल्पग्रस्त कोटयातर्गत झाली आहे व ते सुरुवातीचे ०३ वर्षे कंत्राटी तंत्वावर रुजू झाले आहेत. तसेच महानिर्मिती कंपनीत तंत्रज्ञ-३ पदाच्या कागदपत्रे पडताळणी दरम्यान त्यांनी मुळ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र महावितरण/ महापारेषण कंपनीत जमा केले असल्याबाबत कळविले आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारीत निर्देशांनुसार प्रकल्पग्रस्त कोटयांतर्गत राखीव ०५% समांतर आरक्षणातुन नोकरीचा लाभ केवळ एकदाच घेऊ शकत असल्यामुळे अशा प्रकरणी संबंधित उमेदवारांना "अपात्र" ठरविण्यात आले आहे.

१०) माजी सैनिक (Ex-Serviceman) आरक्षणातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या प्रकरणी उमदेवारांनी भारतीय सेनेत कार्यरत असतांना केलेल्या कामगिरीच्या अनुषंगाने त्यांना बहाल केलेले प्रमाणपत्र हे जाहिरातीत नमुद शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष असल्याबाबतचे प्रमाणपत्रे सादर केली आहेत. अशा प्रकरणी भारतीय सेनेने बहाल केलेले प्रमाणपत्र हे महानिर्मिती कंपनीच्या जाहिरातीत नमुद आय.टी.आय. व्यवसायाशी समकक्ष आहे किंवा नाही याबाबत सन नोव्हेंबर-२०२२ मध्ये Director General Of Resettlement यांनी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने उमेदवारांना पात्र किंवा अपात्र ठरविण्यात आले आहे.

११) माजी सैनिक (Ex-Serivicemen) कोटयातंर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णयांच्या अधीन राहुन रुजु होतांना त्यांनी यापुर्वी माजी सैनिक कोटयातंर्गत नोकरीचा लाभ घेतला नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक असेल. तसेच भविष्यात काही विसंगती आढळुन आल्यास सदरील उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१२) कागदपत्रे पडताळणी दरम्यान असे आढळुन आले आहे की, काही उमेदवारांनी खाजगी संस्थेतून आयटीआय व्यवसाय अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. तथापि सदरील खाजगी संस्था आणि संस्थेमार्फत राबविण्यात असलेला आयटीआय व्यवसाय अभ्यासक्रम शासनमान्य आहे किंवा नाही याबाबत शासनाकडून पडताळणी करण्यात येइल. सध्यस्थितीत सदरील उमेदवारांचा समावेश "अतिरिक्त पडताळणी आवश्यक" असलेल्या उमेदवारांच्या यादीत करण्यात आला आहे. याबाबत शासनाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येईल.

१३) काही प्रकरणी बिगर आयटीआयधारक प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी यांना आयटीआयधारक प्रगत कुशल प्रशिक्षणाचे गुण संबंधित विद्युत केंद्रांकडून देण्यात आले असून त्यानुसार ते उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरीता पात्र ठरले आहेत. तथापि, सदरील उमेदवार कागदपत्रे पडताळणीअंती आय.टी.आय.धारक प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी कोटयातील आरक्षण आणि अतिरिक्त गुण मिळण्यास पात्र नाहीत. तसेच त्यांचा विचार सामान्य श्रेणीतर्गत (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) (सामान्य प्रकल्पग्रस्त ५% कोटा) गुणानुक्रमे करण्यात येईल.

१४) कागदपत्रे पडताळणी दरम्यान काही उमेदवारांना आय.टी.आय. प्रगतकुशल प्रशिक्षणाकरीता १:२ या प्रमाणात बोलावितांना ०१ ते ०४ प्रगतकुशल प्रशिक्षण कोटा आणि ०५ वर्षे व अधिक प्रगतकुशल कोटयातर्गंत पर्याप्त संख्येने उमेदवार प्राप्त न झाल्याने त्यांच्या समोर इतर कोटयातील उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीस बोलाविले होते. त्यानुषंगाने निवड यादी तयार करतांना संबंधित उमेदवारांची निवड त्यांच्या मुळ कोटयासमोर गुणानुक्रमे करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही कोटयात पर्याप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरील रिक्त कोटयातील पदांसमोर प्रथमत: ०५ वर्षे व अधिक प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार आणि तदनंतर ०१ ते ०४ वर्षे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्यक्रम देण्यात आला आहे.

१५) काही उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना समांतर आरक्षणातुन चुकीने अर्ज केला अथवा समांतर आरक्षणातून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे अवैध ठरली असल्यास (समांतर आरक्षण जसे की, अॅप्रेटींसशीप, खेळाडु कोटा, अनाथ, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त इ.) अशा प्रकरणी संबंधित उमेदवारास पुर्णपणे "अपात्र" न ठरविता अशा उमेदवारांचा विचार गुणानुक्रमे सामान्य (कुठलेही समांतर आरक्षण नसलेले) प्रवर्गातून करण्यात आला आहे. तथापि, "दिव्यांग" व "माजी सैनिक" या समांतर आरक्षणतर्गत अपात्र ठरलेल्या उमेदवारांचा सदरील प्रमाणे विचार करण्यात आलेला नाही.

१६) वरील प्रतिक्षा यादी ही सूचना प्रसिद्ध केल्यापासून ०१ वर्षाकरीता वैध असेल. तसेच संबंधित प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ठ असल्याने, निवड यादीतील कोणताही उमेदवार अपात्र / रुजू न झाल्यास त्यांच्या जागी नियुक्ती देण्याबाबत उमेदवारांकडे कोणताही हक्क नसेल. त्याबाबतचा निर्णय महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१७) वरील निवड / प्रतिक्षा यादी तयार करताना ज्या उमेदवारांस समान गुण प्राप्त झाले आहेत, अशा प्रकरणी शासन निर्णयानुसार वयाने जेष्ठ उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच सदरील बाब ही निवड झालेल्या उमेदवारांच्या सेवाजेष्ठतेतही लागू करण्यात येईल.

१८) वरील निवड / प्रतिक्षा यादी ही जाहिरात क्र.०४/२०२४ विरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई आणि नागपूर व औरंगाबाद खंडपीठात दाखल रिट याचिका क्रमांक ७९७४/२०२५, ३८३७/२०२५, ९८/२०२५, १३७९७/२०२४, १८६२१/२०२४, ७१११/२०२५, ३४६२/२०२५, १३७४/२०२५ व इतर रिट याचिकांच्या अधिन असेल.

१९) उपरोक्त अंतिम निवड/ प्रतिक्षा यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

२०) जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये तंत्रज्ञ-३ पदाच्या जाहिराती विरुध्द मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात दाखल रिट याचिका विशेषत: कोराडी सामाजिक उत्तरदायित्व योजना (Koradi CSR) विरोधात नागपुर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.३८३७/२०२५ प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

२१) तंत्रज्ञ-३ पदाच्या पुढील प्रक्रिया जाणून घेण्याकरीता वेळोवेळी महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in "career" या संकेतस्थळास भेट द्यावी.

२२) सदरील सूचनेनुसार प्रसिद्ध पात्रता यादी आणि अंतिम निवड / प्रतीक्षा यादी बाबत उमेदवारांना काही आक्षेप / निवेदन सादर करावयाचे असल्यास, सदरील आक्षेप / निवेदन सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत hohrpap@mahagenco.in या ई-मेलवर सादर करावे. सदरील दिनांकानंतर प्राप्त आक्षेप/ निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**(डॉ.नितीन वाघ)**
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती